महाराष्ट्र शासन
उच्च व तंत्र शिक्षण विभाग
तंत्र शिक्षण संचालनालय , महाराष्ट्र राज्य,३, महापालिका मार्ग, मुंबई ४००००१
दूरध्वनी क्रमांक: ०२२ -२२६२०६०१/२२६९०६०२/२२६४११५०/२२६४११५१
ई-मेल:- director@dtemaharashtra.gov.in
संकेतस्थळ: www.dtemaharashtra.gov.in

---

क्रमांक: १९/परदेशी शिष्यवृत्ती योजना /२०१९-२०/१४१ दिनांक : २१ जून, २०१९

## "जाहिरात"

### उच्च व तंत्र शिक्षण विभागांतर्गत खुल्या प्रवर्गातील "गुणवंत मुलामुलींना परदेशात उच्च शिक्षणासाठी शिष्यवृत्ती" या योजनेअंतर्गत शिष्यवृत्ती निवडीसाठी सन २०१९-२० करिता विद्यार्थ्यांकडून अर्ज मागविण्यात येत आहेत.

महाराष्ट्र शासनाच्या उच्च व तंत्र शिक्षण विभागांतर्गत महाराष्ट्र राज्यातील **खुल्या प्रवर्गातील** ज्या गुणवंत विद्यार्थ्यांनी पदव्युत्तर पदवी, पदव्युत्तर पदविका व पीएचडी अभ्यासक्रमासाठी, THE (Times Higher Education) / किंवा QS (Quacquarelli Symonds) Ranking २०० च्या आतील असलेल्या परदेशातील शैक्षणिक संस्थेमध्ये, शैक्षणिक वर्ष २०१९-२० मध्ये प्रवेश घेतला असेल अथवा प्रवेश घेतील, अशा २० विद्यार्थ्यांना प्रतीवर्षी परदेशी शिष्यवृत्ती मंजूर करण्याबाबतची योजना शासन निर्णय क्रमांक संकीर्ण-२०१८/प्र.क्र.२१८/तांशि-४, दि.०४.१०.२०१८ अन्वये राबविण्यात येत आहे. सदर शिष्यवृत्तीसाठी खालीलप्रमाणे शाखा / अभ्यासक्रम निहाय जागा उपलब्ध असतील :-

| अ.क्र. | शाखा / अभ्यासक्रम | पदव्युत्तर पदवी व पदव्युत्तर पदविका | डॉक्टरेट | एकूण |
|---|---|---|---|---|
| १. | कला | ०१ | ०१ | ०२ |
| २. | वाणिज्य | ०१ | ०१ | ०२ |
| ३. | विज्ञान | ०१ | ०१ | ०२ |
| ४. | व्यवस्थापन | ०१ | ०१ | ०२ |
| ५. | विधी अभ्यासक्रम | ०१ | ०१ | ०२ |
| ६. | अभियांत्रिकी/वास्तुकला शास्त्र | ०४ | ०४ | ०८ |
| ७. | औषधनिर्माणशास्त्र | ०१ | ०१ | ०२ |
| | एकूण | १० | १० | २० |

ज्या विद्यार्थी व विद्यार्थ्याचे आई / वडील अथवा पालक भारताचे नागरिक तसेच महाराष्ट्र राज्याचे अधिवासी आहेत व ज्या विद्यार्थ्यास परदेशातील THE /QS अद्ययावत वर्ल्ड रॅन्कींगमध्ये २०० च्या आंत असलेल्या शैक्षणिक संस्था / विद्यापीठामध्ये पूर्णवेळ पदव्युत्तर पदवी, पदव्युत्तर पदविका किंवा पीएचडी अभ्यासक्रमाच्या प्रथम वर्षासाठी गुणवत्तेनुसार शैक्षणिक वर्ष २०१९-२० मध्ये प्रवेश घेतला असेल अथवा प्रवेश घेतील, तसेच ज्या विद्यार्थ्यांच्या पालकांचे/कुटुबांचे व विद्यार्थी नोकरी करीत असल्यास त्याचे स्वत:चे उत्पन्न धरुन सर्व मार्गांनी

मिळणारे मागील आर्थिक वर्षातील एकत्रित वार्षिक उत्पन्न रु. २०.०० लाखापेक्षा जास्त नाही अशा विद्यार्थ्याकडून या योजने अंतर्गत शैक्षणिक वर्ष २०१९-२० साठी online पद्धतीने अर्ज मागविण्यात येत आहेत. इच्छुक विद्यार्थ्यांनी **www.dtemaharashtra.gov.in/foreignscholarship2019** या संकेतस्थळावर online पद्धतीने अर्ज भरावा व online भरलेल्या अर्जाची प्रत व आवश्यक प्रमाणपत्र व कागदपत्रांच्या साक्षांकित प्रतीसोबत सदर अर्ज **संबंधित कोणत्याही विभागीय कार्यालयात** खालील वेळापत्रकानुसार मूळ प्रमाणपत्रांच्या पडताळणीसाठी सादर करावा.

| क्र. | कार्यक्रम | कालावधी |
|---|---|---|
| १ | **संकेतस्थळावर** online पद्धतीने अर्ज भरणे व आवश्यक प्रमाणपत्र व कागदपत्र अर्जासोबत अपलोड करणे | दि. २२ जून २०१९ पासून<br>दि. १३ जुलै, २०१९<br>(सायंकाळी ५.०० वाजे पर्यंत) |
| २ | online भरलेल्या अर्जाची प्रत व आवश्यक प्रमाणपत्र व कागदपत्रांच्या साक्षांकित प्रती सोबत मूळ प्रमाणपत्रांच्या पडताळणीसाठी संबंधीत विभागीय कार्यालयात सादर करणे.<br>• कला, वाणिज्य, विज्ञान व विधी अभ्यासक्रमासाठी विभागीय कार्यालय, उच्च शिक्षण.<br>• व्यवस्थापन, अभियांत्रिकी / वास्तुकलाशास्त्र व औषधनिर्माणशास्त्र अभ्यासक्रमासाठी विभागीय कार्यालय, तंत्र शिक्षण. | दि. २४ जून, २०१९ पासून<br>दि.१५ जुलै, २०१९<br>(सायंकाळी ५.०० वाजे पर्यंत) |

Online अर्जाशिवाय इतर कोणत्याही पद्धतीने केलेला अर्ज विचारात घेण्यात येणार नाही. इच्छुक उमेदवारांनी निर्धारित कालावधीत वरील प्रमाणे कार्यवाही करणे आवश्यक आहे.

उमेदवारांनी या योजनेच्या सविस्तर अटी व शर्ती, पात्रता, मिळणारे लाभ, शिष्यवृत्तीच्या लाभासाठी निवड कार्यपध्दती इत्यादी माहिती करिता उपरोक्त दिनांक: ०४ ऑक्टोबर, २०१८ तसेच शासन शुध्दीपत्रक दिनांक ३० ऑक्टोबर, २०१८ व दिनांक ११ फेब्रुवारी, २०१९ पहावेत. सदर शासन निर्णय व शुध्दीपत्रके शासनाच्या www.maharashtra.gov.in व या संचालनालयाच्या www.dtemaharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत. विभागीय कार्यालये, उच्च शिक्षण व विभागीय कार्यालये, तंत्र शिक्षण यांची यादीसुध्दा संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आलेली आहे.

संचालक
तंत्रशिक्षण संचालनालय,
महाराष्ट्र राज्य, मुंबई



नरेंद्र मोदी

मा. पंतप्रधान



देवेंद्र फडणवीस

मा. मुख्यमंत्री



विनोद तावडे

मा. मंत्री,

उच्च व तंत्रशिक्षण विभाग



रविंद्र वायकर

मा. राज्यमंत्री,

उच्च व तंत्रशिक्षण विभाग

## महाराष्ट्र शासन

## उच्च व तंत्र शिक्षण विभाग

# उच्च व तंत्र शिक्षण विभागांतर्गत "गुणवंत मुलामुलींना परदेशात उच्च शिक्षणासाठी शिष्यवृत्ती" या योजनेअंतर्गत शिष्यवृत्ती योजना - सन २०१९-२०

महाराष्ट्र शासनाच्या उच्च व तंत्र शिक्षण विभागांतर्गत महाराष्ट्र राज्यातील **खुल्या प्रवर्गातील** जे गुणवंत विद्यार्थी पदव्युत्तर पदवी, पदव्युत्तर पदविका व पीएचडी अभ्यासक्रमासाठी, THE (Times Higher Education) / किंवा QS (Quacquarelli Symonds) Ranking २०० च्या आतील असलेल्या परदेशातील शैक्षणिक संस्थेमध्ये शैक्षणिक वर्ष २०१९-२० मध्ये प्रवेश घेतला असेल अथवा प्रवेश घेतील, अशा २० विद्यार्थ्यांना प्रतीवर्षी परदेशी शिष्यवृत्ती मंजूर करण्याबाबतची योजना राबविण्यात येण्यासंबंधीचा शासन निर्णय क्रमांक : संकीर्ण-२०१८/प्र.क्र.२१८/तांशि-४, दिनांक: ०४/१०/२०१८ जाहीर करण्यात आलेला आहे. सदर शिष्यवृत्तीसाठी शाखा / अभ्यासक्रम निहाय खालीलप्रमाणे जागा उपलब्ध असतील:-

| अ.क्र. | शाखा / अभ्यासक्रम | पदव्युत्तर पदवी व पदव्युत्तर पदविका | डॉक्टरेट | एकूण |
|---|---|---|---|---|
| १. | कला | ०१ | ०१ | ०२ |
| २. | वाणिज्य | ०१ | ०१ | ०२ |
| ३. | विज्ञान | ०१ | ०१ | ०२ |
| ४. | व्यवस्थापन | ०१ | ०१ | ०२ |
| ५. | विधी अभ्यासक्रम | ०१ | ०१ | ०२ |
| ६. | अभियांत्रिकी/वास्तुकला शास्त्र | ०४ | ०४ | ०८ |
| ७. | औषधनिर्माणशास्त्र | ०१ | ०१ | ०२ |
| | **एकूण** | १० | १० | २० |

**अटी :-**

- विद्यार्थी व विद्यार्थ्याचे आई / वडील अथवा पालक भारताचे नागरिक तसेच महाराष्ट्र राज्याचे अधिवासी असणे आवश्यक आहे.
- विद्यार्थ्यास परदेशातील THE /QS अद्ययावत वर्ल्ड रॅन्कींगमध्ये २०० च्या आत असलेल्या शैक्षणिक संस्था / विद्यापीठामध्ये पूर्णवेळ पदव्युत्तर पदवी, पदव्युत्तर पदविका किंवा पीएचडी अभ्यासक्रमाच्या प्रथम वर्षासाठी गुणवत्तेनुसार शैक्षणिक वर्ष २०१९-२० मध्ये प्रवेश मिळालेला असणे आवश्यक आहे.
- तसेच विद्यार्थ्यांच्या पालकांचे/कुटुंबाचे व विद्यार्थी नोकरी करीत असल्यास त्याचे स्वत:चे उत्पन्न धरुन सर्व मार्गांनी मिळणारे मागील आर्थिक वर्षातील एकत्रित वार्षिक उत्पन्न रु. २०.०० लाखापेक्षा जास्त नसावे.
- इच्छुक विध्यार्थ्यानी www.dtemaharashtra.gov.in/foreignscholarship2019 **या संकेतस्थळावर** online पद्धतीने अर्ज भरावा व आवश्यक प्रमाणपत्र व कागदपत्र अर्जासोबत सादर करावीत.
- Online भरलेल्या अर्जाची प्रत व आवश्यक प्रमाणपत्र व कागदपत्रांच्या साक्षांकित प्रतीसोबत सदर अर्ज **संबंधित विभागीय कार्यालयात** वेळापत्रकानुसार मूळ प्रमाणपत्रांच्या पडताळणीसाठी सादर करावा.

उमेदवारांनी या योजनेच्या सविस्तर अटी व शर्ती, पात्रता, मिळणारे लाभ, शिष्यवृत्तीच्या लाभासाठी निवड कार्यपध्दती इत्यादी माहिती करिता उपरोक्त दिनांक: ०४ /१०/२०१८ रोजीचा शासन निर्णय बघावा. सदर शासन निर्णय शासनाच्या www.maharashtra.gov.in व या संचालनालयाच्या www.dtemaharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. तसेच विभागीय कार्यालय, उच्च शिक्षण व विभागीय कार्यालय, तंत्र शिक्षण यांची यादी संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आलेली आहे.

--------------XXXX----------------

# सूचना पत्रक

१. शासन निर्णय उच्च व तंत्र शिक्षण विभाग क्रमांक संकीर्ण-2018/प्र.क्र.218/तांशि-4, दिनांक 4 ऑक्टोबर, 2018 अन्वये महाराष्ट्र शासनाच्या उच्च व तंत्र शिक्षण विभागांतर्गत महाराष्ट्र राज्यातील खुल्या प्रवर्गातील जे गुणवंत विद्यार्थी पदव्युत्तर पदवी, पदव्युत्तर पदविका व पीएचडी अभ्यासक्रमासाठी, THE (Times Higher Education) / किंवा QS (Quacquarelli Symonds) Ranking 200 च्या आतील असलेल्या परदेशातील शैक्षणिक संस्थेमध्ये शैक्षणिक वर्ष 2018-19 मध्ये प्रवेश घेतील, अशा 20 विद्यार्थ्यांना प्रतीवर्षी परदेशी शिष्यवृत्ती मंजूर करण्याबाबतची योजना शैक्षणिक वर्ष 2018-19 पासून राबविण्यात आलेली आहे.

२. सदर शिष्यवृत्तीसाठी **www.dtemaharashtra.gov.in/foreignscholarship2019** या संकेतस्थळावर online पद्धतीने अर्ज मागविण्यात आले आहेत. विद्यार्थ्यांना online पद्धतीने अर्ज करण्याचा कालावधी दिनांक 22 जून, 2019 पासून दिनांक 13.07.2019 सायंकाळी ५ वाजे पर्यंत आहे व online भरलेल्या अर्जाची प्रत (Print) व त्यासोबत जोडण्यात आलेल्या आवश्यक प्रमाणपत्रे व कागदपत्रांच्या साक्षंकित प्रती, मूळ प्रमाणपत्रावरून पडताळणी साठी संबंधित कोणत्याही विभागीय कार्यालयास सादर करण्यासाठीचा कालावधी दिनांक 24 जून, 2019 पासून दिनांक 15.07.2019 सायंकाळी ५ वाजे पर्यंत आहे.

३. दिनांक 15.07.2019 पर्यंत आपल्या कार्यालयात उमेदवार येवून अर्जानुसार प्रमाणपत्र व कागदपत्रांची पडताळणी करून आपल्या कार्यालयाद्वारे संगणकीय प्रणालीतून अर्जाची निश्चिती करेल.

४. **उमेदवाराने अर्ज करण्याची पध्दत :-**

१) सदर शिष्यवृत्तीसाठी उमेदवारांकडून online पद्धतीने अर्ज मागविण्यात आले आहेत. इच्छुक उमेदवारांनी या करीता जाहीर करण्यात आलेल्या वेळापत्रकानुसार कार्यवाही करावी. या करिता **www. dtemaharashtra.gov.in/foreignscholarship2019** या संकेतस्थळास भेट द्यावी.

२) online अर्जाशिवाय इतर कोणत्याही पद्धतीने केलेला अर्ज विचारात घेण्यात येणार नाही.

३) इच्छुक उमेदवारांनी तंत्रशिक्षण संचालनालयाच्या अधिकृत संकेतस्थळावर जावून शिष्यवृत्तीसाठी online पद्धतीने विहित कालावधीत अर्ज करावा.

४) संकेतस्थळावर online पद्धतीने अचूक माहितीसह भरलेला अर्ज संगणकीय प्रणाली मध्ये निश्चित करावा. तसेच उमेदवाराने आपला नजीकच्या काळातील फोटोग्राफ, स्वाक्षरी व अर्जासोबत आवश्यक कागदपत्रे अपलोड करावी.

५) वरीलप्रमाणे संकेतस्थळावर online पद्धतीने अचूक माहितीसह भरलेल्या व संगणकीय प्रणाली मध्ये निश्चित केलेल्या अर्जाची प्रत (Print) व त्यासोबत जोडण्यात आलेल्या आवश्यक प्रमाणपत्र व कागदपत्र यांच्या साक्षांकित प्रतीसह मूळ प्रमाणपत्र व कागदपत्र यांचे पडताळणी करिता नजीकच्या संबंधित कोणत्याही विभागीय कार्यालयात विहित कालावधीत सदर अर्ज सादर करावा.

६) कला, वाणिज्य, विज्ञान व विधी अभ्यासक्रमासाठी शिष्यवृत्ती करीता अर्ज असल्यास उच्च शिक्षण विभागाच्या कोणत्याही विभागीय कार्यालयास व व्यवस्थापन, अभियांत्रिकी / वास्तुकलाशास्त्र व औषधनिर्माणशास्त्र अभ्यासक्रमासाठी अर्ज असल्यास तंत्र शिक्षण विभागाच्या कोणत्याही विभागीय कार्यालय, तंत्र शिक्षण या कार्यालयास विद्यार्थी/पालक यांनी सदर अर्ज सादर करावा.

७) अर्ज सादर करण्यास विद्यार्थी स्वतः येवू शकणार नसेल अश्या परिस्थितीत तो त्याच्या पालकास किंवा कुटुंबातील इतर व्यक्तीस Authority Letter देवून प्राधिकृत करू शकेल.

८) विभागीय कार्यालय अर्जात नमूद केलेल्या माहितीची मूळ प्रमाणपत्रावरून तपासणी करेल व अर्जासोबत सर्व प्रमाणपत्रांच्या व कागदपत्रांच्या प्रती जोडल्या असल्याची खात्री करून प्रत्येक प्रमाणपत्रांच्या प्रतीवर Verified From Original असे प्रमाणित करेल व संगणकीय प्रणालीत अर्जाची निश्चिती करेल.

९) वरीलप्रमाणे अर्जाची तपासणी व संगणकीय प्रणालीत अर्जाची निश्चिती केल्यावर संगणकीय प्रणालीद्वारे तयार केलेली अर्जाची पोचपावती विभागीय कार्यालयातील संबंधित अधिकारी स्वाक्षरी करून एक प्रत अर्जदारास देईल.

१०) विभागीय कार्यालये उमेदवाराचा अर्ज, अर्जासोबतची सर्व Verified From Original असे प्रमाणित केलेल्या प्रमाणपत्र व कागदपत्रांच्या प्रती, संगणकीय प्रणालीद्वारे तयार केलेली अर्जाची पोचपावतीची संबंधित अधिकाऱ्याची स्वाक्षरी असलेल्या दुसऱ्या प्रतीसह एकत्रितपणे यादी करून तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना दिनांक 20 जुलै, 2019 पर्यंत ३, महापालिका मार्ग, मुंबई येथे पुढील कार्यवाहीसाठी हस्तदेय जमा करतील.

११) विहीत मुदतीनंतर प्राप्त झालेले अर्ज कोणत्याही परिस्थितीत विचारात घेतले जाणार नाहीत.

१२) अपूर्ण भरलेला अर्ज विचारात घेतला जाणार नाही.

१३) अर्जासोबत आवश्यक असलेली कागदपत्रे न जोडल्यास अर्ज विचारात घेतला जाणार नाही.

१४) विभागीय कार्यालयाने प्रमाणपत्रांची पडताळणी केलेलाच अर्ज फक्त विचारात घेण्यात येईल.

१५) THE / QS World University Ranking २00 च्या आतील विद्यापीठाशिवाय इतर परदेशी शैक्षणिक संस्थेत प्रवेश घेतलेले अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत.

# महाराष्ट्र शासन
## शिक्षण संचालनालय (उच्च शिक्षण)
## महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे-४११ ००१

web: www.dhepune.gov.in E-mail: school.dhepune@gov.in

फोन नं.०२०/२६१२६९३९ फॅक्स ०२०/२६१११११५३

क्र.उशिसं-२०१९/परदेशी शिष्यवृत्ती योजना/ 8407 दिनांक-२५/०६/२०१९

प्रति,

सर्व विभागीय सहसंचालक

उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य.

**विषयः- उच्च व तंत्र शिक्षण विभागांतर्गत खुल्या प्रवर्गातील "गुणवंत मुलामुलींना परदेशात उच्च शिक्षणासाठी शिष्यवृत्ती" या योजनेंतर्गत शिष्यवृत्ती निवडीसाठी सन २०१९-२० करिता अर्ज मागविणेबाबत करावयाच्या कार्यवाहीबाबत.**

**संदर्भः-**१) शासन निर्णय, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, क्रमांकः संकीर्ण-२०१८ /प्र.क्र.२१८/ताशि-४ , दिनांक ०४ ऑक्टोबर, २०१८.

२) उच्च व तंत्र शिक्षण विभागाचे शासन परिपत्रक क्र.संकीर्ण-२०१८/प्र.क्र.२१८/ताशि-४, दि.१२/११/२०१८.

३) तंत्र शिक्षण संचालनालयाचे पत्र क्रमांकः १९/तंशिसं/परदेशी शिष्यवृत्ती/२०१९/१४३ दि.२४/०६/२०१९

तंत्र शिक्षण संचालनालयाचे दि.२४/०६/२०१९ चे पत्र अवलोकनी घ्यावे.

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने आपणांस कळविण्यात येते की, शासनाच्या उच्च व तंत्र शिक्षण विभागांतर्गत महाराष्ट्र राज्यातील खुल्या प्रवर्गातील जे गुणवंत विद्यार्थी पदव्युत्तर पदविका व पीएच.डी. अभ्यासक्रमासाठी, THE (Times Higher Education)/ किंवा QS (Quacquarelli Symonds) Ranking २०० च्या आतील असलेल्या परदेशातील शैक्षणिक संस्थेमध्ये प्रवेश घेतला असेल अथवा प्रवेश घेतील, अशा २० विद्यार्थ्यांना प्रतिवर्षी परदेशी शिष्यवृत्ती मंजूर करण्याबाबतची योजना शैक्षणिक वर्ष २०१८-१९ पासून राबविण्यात येण्यासंबंधीचा शासन निर्णय दिनांक ०४ ऑक्टोबर, २०१८ रोजी निर्गमित करण्यात आलेला आहे.

उच्च शिक्षण संचालनालयातंर्गत येणाऱ्या कला, वाणिज्य, विज्ञान व विधी या अभ्यासक्रमासाठी प्रत्येकी ०२ संच मंजूर आहेत. सदर शिष्यवृत्तीसाठी शैक्षणिक वर्ष २०१९-२० करीता अर्ज मागविण्यात आले असून, त्या अनुषंगाने उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या वतीने महाराष्ट्रातील सर्व जिल्हयातील "अ" दर्जाच्या एका इंग्रजी व एका मराठी वर्तमानपत्रातील सर्व आवृत्यांमध्ये जाहिरात प्रसिध्द करण्यात आलेली आहे. सदर

शिष्यवृत्तीचे अर्ज विद्यार्थी/पालक संबंधित विभागीय कार्यालयाकडे दिनांक २४जून, २०१९ पासून दिनांक १५ जुलै, २०१९ पर्यंत (सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत) तपासणीसाठी घेऊन येणार आहेत.

याबाबत संदर्भीय शासन निर्णयाचे अवलोकन करावे व त्यातील तरतुदींबाबतची माहिती अवगत करुन उपरोक्त कालावधीमध्ये ऑन लाईन अर्जाची तपासणी व अर्ज स्विकृती करावी. याकरीता आवश्यक लॉगीन आयडी व पासवर्ड आपल्या कार्यालयास ई-मेल द्वारे कळविण्यात येईल. तसेच अर्जाची तपासणी व अर्ज स्विकृती करण्यासाठी मार्गदर्शनपर माहिती पुस्तिका, सुचना पत्रक, शासन निर्णय व जाहिरातीची प्रत सोबत जोडली आहे.

याबाबत आपणांस असेही कळविण्यात येते की, आपल्या स्तरावर यासंबंधी एक पत्रकार परिषद आयोजित करण्यात येऊन, या योजनेची माहिती देण्यांत यावी व **याबाबतची बातमी सर्व स्थानिक वर्तमानपत्रातून प्रसिध्द करण्यात यावी. तसेच सदर योजनेचे पोस्टर तयार करुन आपल्या कार्यालयाच्या दर्शनीय भागात लावण्यांत यावेत.** तसेच आपल्या अधिनस्त सर्व अकृषी विद्यापीठे व संलग्नित महाविद्यालये, संस्थांनाही सदरचे पोस्टर लावण्याबाबत सूचना देण्यांत याव्यात. तसेच प्रवेशाच्या कामासाठी प्रत्यक्ष भेट देणाऱ्या विद्यार्थी व पालकांना याबाबतची माहिती उपलब्ध करुन देण्यात यावी.

तसेच आपणांस कळविण्यात येते की, उपरोक्त वेळापत्रकानुसार अर्ज तपासणी व स्विकृती करुन सर्व अर्ज एकत्रित करुन दिनांक २०जुलै, २०१९ पर्यंत तंत्रशिक्षण संचालनालयास हस्तदेय जमा करण्यात यावेत. सोबत तंत्र शिक्षण संचालनालयाच्या पत्राची प्रत जोडलेली आहे.

तरी आपण आपल्या स्तरावरुन सदर योजनेची प्रसिध्दी व प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी आवश्यक ती कार्यवाही करावी व केलेल्या कार्यवाहीचा सविस्तर अहवाल संचालनालयास सादर करावा.

**(डॉ. धनराज माने)**
शिक्षण संचालक उच्च शिक्षण,
महाराष्ट्र राज्य, पुणे-१.

प्रत: १) मा. सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२ यांना माहितीस्तव.
२) डॉ. अभय वाघ संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, ३ , महापालिका मार्ग, पत्रपेटी क्रमांक १९६७, महाराष्ट्र राज्य, मुंबई